# हसत जगावं

दादाराम साळुंखे

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**हसत जगावं : दादाराम साळुंखे**

© **दादाराम साळुंखे**

'कलारंग' होली फॅमिली स्कूलच्या शेजारी,
प्रकाशानंद कॉलनी, विद्यानगर, कराड, जि. सातारा.
मो. : ९४२३८१६७८२

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**दुसरी आवृत्ती**
सप्टेंबर, २०१२

**किंमत**
रुपये १५०/-

ज्यांनी हे सुंदर जग दाखविले
त्या तीर्थरूप आई-वडिलांस...
आणि
सुख-दुःखात सदैव पाठीशी
असणाऱ्या माझ्या बहिणी
सुनंदा - मंदा - वंदना ...

**- प्रा. दादाराम साळुंखे**

# प्रस्तावना...

'हसत जगावं' हे वैचारिक ललित लेखसंग्रहाचे पुस्तक वाचताना समाज आणि समाजातील विविध प्रकारची माणसं यांच्याशी कुठंतरी आपलं नातं आहे असं सतत जाणवत राहतं. काळाच्या ओघात आणि संपत्तीच्या पाठीमागे लागून माणूस जीवन जगायचे विसरत चालला आहे. जगात सर्व गोष्टींपेक्षा रमणीय आणि जीवनाला सुखकर करणारी गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे आपण सुख-दु:खात जपलेली नाती आणि तीच नाती तुटत चालल्यामुळे माणूस माणसात उरलेला नाही. जीवन सुंदर आहे. त्याचा उपभोग एकदाच घेता येणार आहे हे माहीत असूनही निरर्थक चिंता करून जीवनाची चिता बनविणाऱ्या चिंतातुर जंतुंना हसत कसे जगावे याचा कानमंत्र या पुस्तकाच्याद्वारे मिळाल्याशिवाय राहणार नाही.

रयत शिक्षण संस्था ही एक विचारांची रुजवण करणारी माय-माऊली आहे. कर्मवीर आण्णांच्या रूपानं महाराष्ट्रात एक देवमाणूस उभा राहिला. त्यांनी रयतेच्या स्वरूपात समाजावर वेगळा विचार, संस्कार देण्याचा प्रयत्न केला. या संस्थेच्या ध्येय-धोरणांशी बांधिलकी असलेला एक तरुण, त्याच संस्थेच्या विविध शाळांत, महाविद्यालयात शिकून पुढं आला आहे. आण्णांनी व या संस्थेतल्या अनेक थोर मंडळींनी दिलेला वारसा जपण्याचं, पुढं नेण्याचं तो तरुण काम करतो आहे. त्या तरुण प्राध्यापकाचं नाव आहे दादाराम साळुंखे. खरं तर माझा हा लाडका विद्यार्थी. आई-वडिलांनी काबाडकष्ट करून त्याला लहानाचा मोठा केला. विचाराचे अपार धन त्याच्याजवळ दिलं. प्राध्यापकी करत करतच समाजाला कथारूपानं त्यानं हे सारं सांगण्याचा प्रयत्न केला आहे. दै. लोकमतच्या 'सलाम नमस्ते' या सदरातून हे सारं प्रा. दादाराम साळुंखे सातत्यानं लिहीत आले आहेत. दर शनिवारी त्यांचा लेख आवर्जून प्रसिद्ध व्हायचा. मी तर या लेखाची आतुरतेनं वाट बघायचो. अब्राहम लिंकन, छ. शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद या थोरामोठ्यांच्या विचारांपासून ते सामान्यातल्या सामान्य माणसाजवळ असलेले मानवी गुण त्यांनी याद्वारे प्रकाशित

करण्याचा प्रयत्न केला आहे. जन्मदात्री आई, चैतन्याचा सागर- आई या लेखापासून सुरुवात करून संत ज्ञानेश्वर, तुकाराम महाराज, मदर तेरेसा, सावित्रीबाई फुले, जिजाबाई, झाशीची राणी, इंदिरा गांधी, कल्पना चावला, सुनिता विल्यम्स, साधनाताई आमटे, किरण बेदी यांच्या विचारांचा अमोल ठेवा त्यांच्या अनुभवशैलीतून व्यक्त होऊन समाजापुढे ठेवला आहे. त्या प्रत्येकाच्या संदर्भात येणाऱ्या व्यक्ती, त्यांच्या जीवनात घडलेले प्रसंग आणि त्यावरून सामान्यांनी घ्यावयाचा बोध हे सारं आपल्या समर्थ लेखणीने त्यांनी परखडपणे काही वेळा हळुवारपणे मांडले आहे.

कधी सत्यवान-सावित्रीची कथा ते सांगतात, तर कधी ज्ञानेश्वर महाराजांना 'माऊली' ही उपाधी कशी मिळाली याचं विवेचन करताना त्यांनी सोसलेल्या हाल-अपेष्टांचे मूर्तिमंत चित्रण ते उभं करतात. महायोगी चांगदेवांना लिहिलेल्या प्रत्राचा दाखला देताना 'डोंगराएवढा माणूस पूर्ण वितळून गेला आणि नतमस्तक झाला तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना आदराने प्रणामच केला' हे लिहिताना त्यांनी संस्काराचा पुरेपूर ऊहापोह केला आहे.

जीवन म्हणजे पैसा, सौंदर्य, लाचारी, हेवेदावे, दुसऱ्याबद्दल असूया नव्हे तर जीवन म्हणजे पराक्रम, साहस, युद्ध, स्वाभिमान, ज्याला प्रामाणिकपणाची, निर्मळ मनाची झालर लाभलेली असेल, जो हातावरील रेषांवर विश्वास न ठेवता मनगटावरील ताकदीवर विश्वास ठेवतो, तोच खऱ्या अर्थाने जीवन जगू शकतो. अशी बोधपर विधाने शब्दांच्या जोरदार ताकदीने त्यांनी लिहिली आहेत. समृद्ध जीवनाचा साक्षात्कार देताना त्यांची लेखणीही तितकीच समृद्ध झाली आहे.

डॉ. माधवन नायर या इस्रोच्या संचालकांनी भारताचे चांद्रयान यशस्वीपणे चंद्रावर पोहोचावे म्हणून घेतलेले अपार कष्ट, मेहनत यामुळेच यशसिद्धी प्राप्त होते हेही प्रभावीपणे मांडलेले आहे. पंडित भीमसेन जोशी यांना मिळालेले 'भारतरत्न' या भारतातील सर्वोत्कृष्ट पुरस्काराचेही सार्थक झाल्याचे लिहितात. अमेरिकेचे नूतन अध्यक्ष बराक ओबामा यांना नुकताच शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला. ओबामा हे या पुरस्काराने धन्य झाले तरी त्यांची तुलना म. गांधींच्या कार्याशी करता येत नाही हे पुरस्कार जाहीर होण्यापूर्वीच लिहितात. म्हणजे विचार प्रकट करताना, त्याविषयी लिहिताना कशाचीही भीडभाड ठेवताना ते दिसत नाहीत. शब्द हे अमोघ अस्त्र आहे हेही ते विसरलेले नाहीत. 'कर्तव्याने घडतो' माणूस या लेखात दुसऱ्या महायुद्धात अणुबॉम्बने बेचिराख झालेले 'जपान' पुन्हा नव्याने उभे राहताना जपानी माणसांनी कर्तव्याचा आदर्श जगासमोर ठेवला. तेथील स्त्रियांनी जपान पुन्हा उभा केला. सरकारी सेवेत असणारी माणसे सकाळी दहाच्या ऐवजी नऊलाच येऊन कार्यालयात आपल्या कामाला सुरुवात करतात आणि आपले काम वेळेत पूर्ण करतात. हे लिहिताना ते आपल्या भारतीयांचे विशेषत: महाराष्ट्रीयन कार्यालयात काम कसे चालते याची तुलना करून दाखवितात. शरीर, सौंदर्य देणं हे परमेश्वराच्या हाती असले तरी सूज्ञ जगाचे लक्ष सौंदर्यापेक्षा माणसांच्या कर्तव्याकडे असते. असे कर्तव्य माणसाच्या अंगात विलक्षण चैतन्य निर्माण करते म्हणूनच आपण पत्करलेले काम मनापासून करणे हेच प्रत्येक माणसाचे कर्तव्य आहे हे धाडसाने लिहायलाही ते विसरत नाहीत.

सशस्त्र क्रांतीची स्थापना करून ठोशास ठोसा या न्यायाने इंग्रजांबरोबर लढणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल त्यांनी लिहिले आहे. स्वत:च्या घरावर तुळशीपत्र ठेवून 'मूलबाळ होणं, चार काटक्या बांधून घरटी बांधणे हे काम चिमण्या कावळेही करतात, पण हजारोंच्या घरात सोन्याचा धूर निघावा असे वाटणे म्हणजे संसार होय.' असं आपल्या पत्नीला सावरकर सांगतात. या लिहिण्यामुळे अंगावर नकळत शहारे येऊन जातात. मदर तेरेसा, धीरूभाई अंबानी, नेल्सन मंडेला, मायकल जॅक्सन यांची जीवनशैली समोर मांडताना त्यांच्या आयुष्यातला थरारही ते सांगायला विसरत नाहीत. 'आनंदातला आनंद' या लेखात पंढरीच्या वारीत म्हातारी माणसं जेव्हा टाळ, वीणा घेऊन नाचायला लागतात तेव्हा त्यांना मिळालेला आनंद वर्षभर पुरत असतो. त्यांच्या चेहऱ्यावरचा भाव त्यांच्या अंगाअंगात संचारणारा उत्साह, असे अखंडपणे आनंदाच्या डोहात डुंबणाऱ्यांचा भाव, त्यांच्या अंगाअंगात संचारणारा उत्साह, असे अखंडपणे आनंदाच्या डोहात न्हाऊन निघणारे वारकरी पाहायला त्या वारीतच गेलं पाहिजे. 'तो पाहतो आहे.' या लेखात एक सैनिक सांगतो आहे, 'जेव्हा मी बॉम्ब टाकून तळावर आलो तेव्हा टी.व्ही. वर त्या दोन शहरांमध्ये उडालेला भयंकर हाहाकार मी पाहिला. त्यात लहान मुलांपासून ते म्हाताऱ्या माणसांपर्यंत अनेकांची प्रेतेच प्रेते पडली होती. ते दृश्य अनेक दिवस माझ्या स्वप्नात येत होते. एवढेच नव्हे तर त्या दिवसापासून मला सुखाची झोप कधी लागलीच नाही. याही पुढे ज्या दिवशी मी जपानवर बॉम्ब टाकला त्या दिवसापासून ते मरेपर्यंत

माझी आई माझ्याशी बोलली नाही. म्हणजेच हे सर्व तो पाहतो आहे. याची बोच मानवी मनाला सारखी लागलेली असते. हे अतिशय उत्कटपणे त्यांनी मांडले आहे.

वाचनसंस्कृती जपण्यासाठी आपण सर्वांनी खरंच मनापासून प्रयत्न केले पाहिजेत. वाचनाची आवड लावली पाहिजे, निर्माण केली पाहिजे. यासाठी ग्रंथचळवळीचे काम करताना प्रा. साळुंखे भरभरून बोलत असतात. खेड्याखेड्यात ग्रंथालयं उभारावी ही प्रेरणा त्यामागचीच. यासाठी थोरामोठ्यांची व्याख्यानं आयोजित करणं, ग्रंथसंमेलनं घेणे, एखाद्या चांगल्या ग्रंथातले विचार दहा-वीस माणसांच्यापुढेही कथन करून सांगणं यासाठी त्यांची मोठी धडपड चालू असते. ग्रंथावर प्रेम करणारा, ग्रंथालयं उभारण्यास प्रेरणा देणारा, त्याद्वारे विचाराची क्रांती घडवून आणणारा हा प्राध्यापक म्हणजे खऱ्या अर्थानं गुरुकुलात शोभणारा एक ऋषीच म्हणायला हवा. अगदी लहान वयात त्यांनी हे संपादन केले आहे.

विचारांचं प्रवर्तन घडल्याशिवाय नवा समाज घडणार नाही. यासाठी अनेक युवक तयार व्हावेत. ते तयार करण्यासाठी प्रा. साळुंखेंच्या शब्दांतून प्रेरणा मिळावी ही सदिच्छा.

**डॉ. प्रकाश शिवराम खोचीकर**
अध्यक्ष,
महाराष्ट्र विज्ञान अध्यापक महामंडळ, पुणे

# *मनोगत...*

'हसत जगावं' या माझ्या पहिल्या पुस्तकातून शब्दांच्या दुनियेत प्रवेश करताना खूप आनंद होत आहे. महाविद्यालयातील जीवनात असताना वर्तमानपत्रातून वार्ताहर म्हणून काम केले. वर्तमानपत्रातील लेखन हे बातमी पुरते मर्यादित असायचे. पुढे विविध मासिकांमधून कधी स्फुट, तर कधी पुस्तकांचे परीक्षण केले. ज्या ज्या ठिकाणी संधी मिळेल त्या त्या ठिकाणी लेखन केले. यातूनच एकदा दै. सकाळ, मधल्या 'मुक्तपीठ' या सदरामधून संधी मिळाली. त्या एका लेखाने माझे संपूर्ण जीवनच बदलून गेले. लेखनाबद्दलचा आत्मविश्वास निर्माण झाला. दरम्यान दै. लोकमतचे जगदीश पाटील व प्रमोद सुकरे यांनी लोकमतमधील लोकप्रिय सदर 'सलाम-नमस्ते' या सदरात लेखन करण्याची संधी दिली. मुकुंद फडके, बाबर सर यांच्यासह केळकर मॅडम यांचा माझ्या लेखनावर विश्वास होता. यामुळे लेखन करण्यास सज्ज झालो. लोकमतमधील अनेक लेखांनी अक्षरश: जेथे जाईन तेथे माणसं ओळखू लागली. एक वेगळाच अनुभव येऊ लागला. विद्यार्थ्यांपासून वृद्धांपर्यंत अनेकांनी तोंड भरून कौतुक केले. ही लेख मालिका बंद झाल्यावर अनेकांनी फोन करून तुमचे लेख कधी वाचायला मिळणार अशी विचारणा केली. अनेकांनी सर्व लेख एकत्र करून पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित करण्याचे सुचविले. अशा सर्वांच्या मताचा आदर करून सर्व लेख पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याची संधी 'अजब' प्रकाशनमुळे मिळाली. ग्रंथालयाच्या चळवळीत काम करताना आपणही शब्दांच्या दुनियेत खारीचा वाटा उचलावा हीच खरी प्रेरणा या पुस्तकाच्या पाठीमागे आहे.

या पुस्तकामध्ये जे विविध लेख आले आहेत, त्यामध्ये आपल्या अवती-भवती घडणाऱ्या अनेक घटना आल्या आहेत. सध्याच्या स्थितीत माणसाचे जीवन कठीण होत चालले आहे. याला बऱ्याच अंशी माणूसच जबाबदार असून अनेक सुखसोयींच्या मागे लागून चैन करण्याच्या वेडापायी तो भरकटत चालला आहे.

माणसाला जवळ घेण्यापेक्षा तो प्राण्यांना जवळ घेऊ लागला आहे. पैसा म्हणजे सुख ही त्याची कल्पना त्याला दु:खाच्या खाईत लोटत आहे. हे सगळं करताना आपल्याला कोणीच 'पाहात' नाही असे त्याला वाटायला लागले आहे. परंतु ज्याने जन्म दिला आहे तो मात्र सदैव पाहतो आहे. 'आई' चे स्थान डळमळू लागले आहे. स्त्री मुक्त झाली असे म्हणत असतानाच हजारो स्त्रिया एकमेकींचा छळ करत आहेत. याचाच अर्थ पुरुषप्रधान संस्कृतीतून मुक्त होत असलेली स्त्री परत एकदा स्त्रीप्रधान संस्कृतीत अडकत चालल्याचे चित्र उभे आहे. त्याग, आत्मविश्वास, यश, स्वप्न इत्यादी विविध जीवनमूल्यांतून विविध अडचणींवर आपणाला कशी मात करता येऊ शकते याविषयी विविध उदाहरणे देऊन पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. विविध वर्तमानपत्रे, मासिके, विविध वक्त्यांची भाषणे, विविध सुविचारांची पुस्तके इत्यादीमधून संकलित केलेले विचारही यामधून मांडण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे.

बहुजन समाजाला शिक्षणाची दारे उघडून देणारे रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी माझ्यासारख्या अनेकांची घरे उभी केली. कर्मवीरांच्यावर हृदयापासून प्रेम करणारे माझे आई-वडील आजही त्यांच्या प्रतिमेला हार घालून नमस्कार केल्याशिवाय चहाचा घोट घेत नाहीत. माझ्या लेखनाला प्रसिद्धी देऊन कौतुक करणारे दै. सकाळचे श्रीराम पवार, श्रीकांत कात्रे, राजेश सोळस्कर, राजेश पाटील, सचिन शिंदे, सचिन देशमुख, लोकमतचे मुराद पटेल, अमोल जाधव, तरुण भारतचे प्रदीप कुंभार, ऐक्यचे प्रा. अशोक चव्हाण, अर्जुन धस्के, पुढारीचे चंद्रकांत पाटील, मोहनेसर, सामनाचे गजानन चेणगे, पुण्यनगरीचे बाळासाहेब कदम, सुधीर पाटील, माझे पीएच.डी. चे मार्गदर्शक डॉ. व. न. कुबेर, डॉ. कन्हैया कुंदप, डॉ. सुमन पाटील, प्रा. सूर्यमाला जाधव, प्रा. सौ. शोभना रैनाक, प्रा. सौ. सरलादेवी निकम, श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय, मालेगांव येथील प्राचार्य डॉ. उज्ज्वला देवरे, सौ. शिल्पा रविढोणे.

माझ्या लेखनाचे कौतुक करून पाठीवर मायेने हात फिरविणारे रयत शिक्षण संस्थेचे व्हा. चेअरमन डॉ. अनिल पाटील, सचिव जे. जी. जाधव, सहसचिव गुंडाप्पा खोत, निरीक्षक मोहनराव कदम, डॉ. मोहन राजमाने, डॉ. अशोक भोईटे, प्रा. संभाजीराव पाटणे, डॉ. दत्ताजी नलावडे, डॉ. यशवंत पाटणे, प्रा. सुकुमार शेटे, डॉ. शारदा गंधे, श्री. के. एन. देसाई, श्री. प्रकाश खोचीकर, प्रा. व्ही. पी. पाटील, प्रा. जे. के. थोरात, प्रा. अधिकराव मोहिते, मेजर पी. एस. गायकवाड, प्रा. मानसिंग जाधव, प्रा. गणेश पाटील, प्रा. रमेश भोर, प्रा. संजय महाडिक, प्रा. लक्ष्मण जगदाळे, प्रा. सुभाष पाटील, प्रा. डी. के. खोत, प्रा. अरुण बावळेकर, श्री. महादेव साने, डॉ. मिलिंद शहा, पार्थ पोळके, राजेंद्र घाडगे, प्रा. सुधीर कुंभार, प्रा. डी. डी. थोरात, संजय इंगवले, नंदाताई जाधव.

अडचणीच्या काळात सदैव पाठीशी राहणारे भारत मोटर्स (कराड) चे मालक विजय चव्हाण, राजेश कुंभार, प्रदीप साळुंखे, प्रमोद-रुपेश चव्हाण, नाना शेटे, जीवन पवार, ग्रंथपाल संजय शिंदे, सैदापूर गावचे लाडके व्यक्तिमत्त्व आदरणीय विठ्ठलराव जाधव, मोहनराव जाधव, मंद्रुळ-काळे या छोट्याशा गावाला महाराष्ट्राच्या नकाशावर आणणारे माथाडी कामगार नेते कै. आण्णासाहेब पाटील, पाटणच्या राजकारणात ज्यांच्याशिवाय राजकारणात काहीही चालत नाही ते माझे आदरणीय आप्पा कै. सर्जेराव पाटील आणि आदरणीय बापू हिंदुराव पाटील यांचे ऋण न फिटणारे आहेत.

ग्रंथालय चळवळीच्या निमित्ताने परिचय झालेले 'अजब प्रकाशन'चे राकेश शहा व त्यांचे इतर सहकारी, माझ्या या छोटेखानी पुस्तकाला प्रस्तावना देणारे श्री. प्रकाश खोचीकर.

वरील सर्वांचे शतश: आभार !

**– प्रा. दादाराम साळुंखे**